# भारती विद्यापीठ
(अभिमत विश्वविद्यालय)

## यशवंतराव मोहिते (कला, विज्ञान व वाणिज्य) महाविद्यालय, पुणे

एरंडवणे, पुणे – ४११ ०३८.

★ राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद यांच्याकडून मूल्यांकनात 'A+' दर्जा प्राप्त. (२०१७) ★

★ एम्.एच्.आर्.डी. यांच्याकडून विद्यापीठास 'अ' दर्जा प्राप्त. ★

संस्थापक–कुलपती :
**डॉ. पतंगराव कदम**
एम्.ए., एलएल.बी., पीएच्.डी.

प्रभारी प्राचार्य :
**प्रा. डॉ. व्ही. ए. रणखांबे**
एम्.ए., एमफील., पीएच्.डी.डीप्लोमा इन कीर्तन(नारदीय आणि वारकरी)

Estd. 1964
Celebrating
and Beyond
BHARATI VIDYAPEETH
Founder Hon'ble Dr. Patangrao Kadam

फोन नं : (०२०) २५४३३३८३, २५४२४१६३
फॅक्स : (०२०) २५४४०२०१
ई–मेल : bvduymc@hotmail.com
ymc@bharatividyapeeth.edu
वेबसाईट : ymc.bharatividyapeeth.edu


जा.क्र.: साज्ञास/१३९४/२०२२-२०२३ — दि. १५/१०/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक

भारत सरकारने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीवरून 'अभिमत विश्वविद्यालय दर्जा' बहाल केलेले भारती विद्यापीठ हे शैक्षणिक विश्वातील एक नामांकित विद्यापीठ गणले जाते. भारती विद्यापीठ या शैक्षणिक संस्थेने यशवंतराव मोहिते महाविद्यालयाची सन १९७८ मध्ये स्थापना करुन उच्च शिक्षण क्षेत्रात पदार्पण केले. गेल्या चार दशकाहून अधिक काळ विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेऊन कार्यरत असलेले हे महाविद्यालय कला, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना अशा विविध क्षेत्रात अनेकविध नामांकित पुरस्कारांचे मानकरी ठरले आहे.

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात संधी प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे लागते. त्यांची तयारी करवून घेण्यासाठी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन विभाग कार्यरत आहे. भारती विद्यापीठाचे संस्थापक व भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे चे संस्थापक - कुलपती डॉ. पतंगराव कदम साहेब यांच्या देदीप्यमान कर्तृत्वाला अभिवादन करीत गेली ३८ वर्षे आमचे महाविद्यालय या राष्ट्रीय स्तरावरील आंतरमहाविद्यालयीन सामान्य ज्ञान स्पर्धा परिक्षेचे आयोजन करीत आले आहे. दि. ८ जानेवारी २०२३ रोजी डॉ. पतंगराव कदम साहेब यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या अलौकिक कार्याचा वारसा पुढे चालवित आम्ही या वर्षाच्या स्पर्धा परीक्षेचा उपक्रम शनिवार, दिनांक ७ जानेवारी २०२३ रोजी ऑनलाईन आयोजित करीत आहोत. या स्पर्धा परीक्षेतून स्फूर्ती घेऊन अनेक विद्यार्थी आज केंद्र व राज्य सरकारच्या विविध प्रकारच्या मानाच्या पदावर कार्यरत आहेत याचा आम्हांस मनस्वी अभिमान आहे.

२०२२ - २०२३ हे शैक्षणिक वर्ष या स्पर्धा परीक्षेचे ३९ वे वर्ष आहे. सदर स्पर्धा परीक्षेसाठी आपण आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या ज्ञानसत्रामध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन करावे हि, विनंती.

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धा परीक्षेला बसता येणे सहज शक्य व्हावे यासाठी आपणही परीक्षा केंद्र सुरु करु शकता. त्यासाठी किमान १०० विद्यार्थ्यांची नाव नोंदणी अपेक्षित आहे.

परीक्षा केंद्र विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी या पत्रासोबत जोडलेला फॉर्म भरुन दि. २० डिसेंबर २०२२ पूर्वी पाठवून द्यावा. अधिक तपशीलासाठी ९८२२५३९८८३ / ९७३०३६४१४०, ९४२३५२८५६० या क्रमांकावर संपर्क साधावा, ही विनंती.

आपला सकारात्मक प्रतिसाद अपेक्षित आहे.

(प्रा.डॉ. ए. बी. पवार)
प्रमुख संयोजक

(प्रा. डॉ. व्ही. ए. रणखांबे)
प्रभारी प्राचार्य

सोबत:- १. राष्ट्रस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा माहिती पत्रके

२. राष्ट्रस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करण्यासंबंधीचा फॉर्म